## *Appendix XVIII (v)*, (Vide Article - 18.01)

**संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रमात महिला बचत गटांचा**
**सहभाग वाढविण्यासाठी विशेष कृती कार्यक्रम.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्र.एफडीएम - २०१०/प्र.क्र.४०/फ-२**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२**
**दिनांक :२१.६.२०१०**

**वाचावे :-** १) शासन निर्णय क्र. एसएलएफ - १०९१/प्र.क्र.-११९/फ-११, दि. १६.३.१९९२
२) शासन निर्णय क्र. एमएससी /२०००/प्र.क्र.-१४३/फ-२, दि. २५.०४.२००३.

**प्रस्तावना :-**

राष्ट्रीय वननिती, १९८८ मधील तरतुदींच्या अनुषंगाने राज्यातील वनांचे संरक्षण, संगोपन व विकासा करीता स्थानिक ग्रामस्थांच्या सहभाग प्राप्त करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दि.१६ मार्च, १९९२ च्या शासन निर्णयाव्दारे संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रम सुरु केला व तद्नंतर हया कार्यक्रमाच्या सुमारे दहा वर्षाचा अनुभवा आधारे व केन्द्र शासनाच्या सुधारित मार्गदर्शक सूचना च्या अनुषंगाने दि.२५/४/२००३ च्या शासन निर्णयाव्दारे संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रमाच्या स्वरुपात सुधारणा करुन हया कार्यक्रमाची व्याप्ती वाढविली.

आजमितीस राज्यातील सुमारे १५५०० वनालगत असलेल्या गावांपैकी सुमारे १२६०० पेक्षा जास्त गांवात संयुक्त वन व्यवस्थापन समिति गठित झाली असून त्यांच्या सभासदांची एकुण संख्या २६ लक्षाहून अधिक झाली असून त्यापैकी सुमारे २५ टक्के महिला सदस्य आहे.

मा. मंत्री (वने) यांनी सांगली येथील मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम न्यास, पुणे यांच्यावतीने आयोजित कृष्णाई महोत्सव-२०१० च्या महिला बचत गटाच्या मेळाव्यामध्ये महिला बचत गटांना वन विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या संयुक्त वनव्यवस्थापन कार्यक्रमाद्वारे कामे देण्याची घोषणा केलेली आहे. राज्यात सध्या ग्रामीण व शहरी भागामध्ये कार्यरत असणाऱ्या महिला बचत गटांची संख्या मोठी आहे. वन विकासाच्या कामात महिलांचा सहभाग प्राप्त झाल्यास वनाचे अधिक चांगल्यारितीने संगोपन होवून केंद्र शासनास अपेक्षीत असलेल्या जनतेचा संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रमात सहभाग वाढणार आहे.

केन्द्र शासन तसेच राज्य शासनाने विविध विकास कार्यक्रमात महिलांचा सक्रिय सहभाग घेण्याचे धोरण अंगीकारले आहे. त्या अनुषंगाने संयुक्त वनव्यवस्थापन कार्यक्रमाच्या अंमल बजावणीत महिला सक्रीय सहभाग वाढविण्यासाठी शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

चालू आर्थिक वर्ष २०१०-११ पासून संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांव्दारे राबवणा-या विविध योजनेच्या अंमल बजावणीत समितीकडे नोंदणीकृत असलेल्या स्थानिक महिला बचत गटांना प्रथम प्राधान्य दिले जाईल. संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या कार्यक्षेत्रात एकापेक्षा जास्त महिला बचत गटांना समितीकडे नोंदणी करुन व समिती सोबत समझोता- समयलेखा (एम.ओ.यू.) करुन समिती मार्फत राबविण्यात येणा-या कार्यक्रमातील विविध बाबींच्या अंमल बजावणीत त्यांच्या क्षमतेनुसार सहभागी होवून लाभान्वित होता येईल.

दि.२५/४/२००३ च्या शासन निर्णया मध्ये विहित केल्या प्रमाणे संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या मंजूर सुक्ष्म आराखडयातील मंजूर बाबी निधिच्या उपलब्धते प्रमाणे राबविण्या करिता त्यातील विविध कामे जसे वनीकरणाची कामे, जल मृदसंधारणाची कामे, प्रेरक प्रवेश कामे (EPA) इत्यादि किंवा त्यातील विशिष्ट कामे जशी रोपवाटिकेची कामे, वनीकरणातील निंदणीची कामे, वन वणवा प्रतिबंधक कामे, रोपवनाच्या संरक्षणाची

कामे इत्यादि कामांची अंमलबजावणी महिला बचत गटांमार्फत त्यांची क्षमता व पूर्वाअनुभवाच्या आधारावर प्रथम प्राधान्य देवून राबविण्यात येईल. अशा कामांच्या मंजूर अंदाजपत्रका प्रमाणे तसेच मंजूर उपलब्ध तरतूद तीन समान हफ्त्यात बचत गटांना त्यांच्या बँक खात्यात जमा करुन पुरविली जाईल. पहिला हफ्ता संयुक्त वन व्यवस्थापन समितीने बचत गटाला कार्यआदेश (Work Order) दिल्यावर, दुसरा हफ्ता ५० टक्के कामे समाधानकारक रित्या पूर्ण झाल्यावर तसेच उर्वरित रकमेचा तीसरा हफ्ता कामे समाधान कारकरित्या पूर्ण केल्यावर दिला जाईल. त्याशिवाय मंजूर अंदापजत्रकातील ओवर हेड (Over head) खर्चाची तरतुद प्रमाणानुसार (proportionate) संबंधित महिला बचत गटास प्रोत्साहनार्थ देण्यात येईल.

संयुक्त वन व्यवस्थापन समिती त्यांची स्थानिक परिस्थिती व क्षमतानुरुप मंजूर सूक्ष्म आराखडयाच्या तरतूदींच्या आधिन राहून शासनाच्या विविध योजनांचा फायदा घेवून, विशेष रित्या दुर्गम आदीवासी भागात, स्थानिकरित्या उपलब्ध वनोपजावर आधारित लघु/सूक्ष्म उद्योगामार्फत आर्थिक उत्पन्न वाढविण्याचे कार्यक्रम सुध्दा हाती घेत आहे. यासाठी राज्य व केन्द्र शासनाच्या मंजूर योजनेतून निधी उपलब्ध होत आहे. वनोपजावर आधारित सूक्ष्म उद्योगांच्या अंमल बजावणीत सुध्दा या पुढे संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या कार्यक्षेत्रातील महिला बचत गटांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रमाचा शासनाचा दिनांक २५.४.२००३ च्या शासन निर्णयातील तरतुदीप्रमा संयुक्त वन व्यवस्थापन समितीद्वारे वर्गीकृत क्षेत्रापासून वनोपजाचे संकलन व त्यावरील प्रक्रीयेचे काम प्राधान्याने महिला बचत गटांना देण्यात येईल. याद्वारे अशा महिला बचत गटांच्या आर्थिक उत्पन्नात नियमित भर पडण्यास मदत होईल. पर्यायाने ती अधिक सक्षम व आर्थिकदृष्टया स्वावलंबी होतील.

**महिला बचत गटांची क्षमता वृध्दि करणे :-**

विविध प्रकारची कामे योजनेतील तरतूदी प्रमाणे शास्त्रोक्त पध्दतीने कालबध्द रित्या करणे, शासकिय निधीचा हिसोब ठेवणे, वनोपजांवर आधारित सुक्ष्म उद्योग चालविण्या करिता आवश्यक कच्चा माल, निधीची उपलब्धता विषय बाबी तयार मालाची विक्री इत्यादी आवश्यक बाबी विषयक महिला बचत गटांना आवश्यक ते प्रशिक्षण देवून त्यांची क्षमता बांधणी करण्यात येईल.

**विशेष कृती कार्यक्रम :-**

वनांचे संरक्षण व संवर्धन करिता स्थानिक पातळीवर महिलांचा सहभाग आवश्यक आहे याची जाणीव ठेवून राज्याचे वन व वृक्ष आच्छादित क्षेत्र जलद गतीने वाढविण्याकरिता संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रमाच्या माध्यमातून महिला बचत गटांचा सहभागाची व्याप्ती मोठया प्रमाणावर वाढविण्या करिता एक विशेष कृती कार्यक्रम पुढील पांच वर्षाकरिता (वर्ष २०१०-११ ते २०१४-१५ पर्यंत) राबविण्यात येईल. त्या करीता संयुक्त वन व्यवस्थापन समिती गठीत झालेल्या सुमारे १२५०० गावात सरासरी प्रत्येक गांवात दोन याप्रमाणे राज्यात पुढील पाच वर्षात २५००० ग्रामीण महिला बचत गटाची क्षमता.बांधणीचे उध्दीष्ट समोर ठेवून व हया महिला बचत गटा मार्फत गांव पातळीवर वन तसेच वनेत्तर क्षेत्रावर मोठया प्रमाणात वृक्ष लागवड, संरक्षण व संगोपन करुन महाराष्ट्र वन धोरण २००८ व्दारे ठरविल्या प्रमाणे राज्याच्या वनाच्छादित क्षेत्र मोठया प्रमाणावर वाढविण्यात येईल. वरील प्रमाणे पुढील पाच वर्षाकरीता (२०१०-११ ते २०१४-१५ पर्यंत) वनवृत्त/वर्षवार विगतवारी सोबत जोडलेल्या जोडपत्र -अ- मध्ये दर्शविण्यात आली आहे.

**विशेष कृती कार्यक्रमासाठी निधीची व्यवस्था :-**

विशेष कृती कार्यक्रम हा वनविभागाचा एकूण वार्षिक योजनेचा भाग राहणार आहे. विभागाकडे उपलब्ध असलेल्या जिल्हा व राज्यस्तरीय योजना, आदीवासी उपयोजना, केन्द्र पुरस्कृत योजना, रोजगार हमी योजना, वित्त आयोगाकडून उपलब्ध होणारा विशेष निधी इत्यादी या स्त्रोतातून निधी उपलब्ध करण्यात येईल

**कार्यक्रमाची अंमलबजावणी व सनियंत्रण :-**

ह्या विशेष कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी सन २०१०-११ ते २०१४-१५ या पाच वर्षाचा कालावधीसाठी करण्यात येईल. सदर कार्यक्रमासाठी सर्व उपलब्ध निधी श्रोतातून ज्यास्तीत-जास्त निधी उपलब्ध करुन जोडपत्र - अ वर दर्शविल्या प्रमाणे वार्षिक उध्दीष्ट पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित प्रादेशिक वनवृत्त प्रमुखांची राहील. ह्या विशेष कृती कार्यक्रमाचा त्रैमासिक प्रगती अहवाल प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन दल प्रमुख) म.रा. नागपूर हे शासनास सादर करतील.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१००७०११५४८०३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही/-
(प्रफुल्ल ठाकूर)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रति,

१. मा. मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव,
२. सर्व मंत्री, राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
३. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
४. महाराष्ट्र शासनाच्या सर्व संबंधीत प्रशासकीय विभागांचे प्रधान सचिव व सचिव,
५. प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
६. संचालक सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
७. मुख्य वनसंरक्षक (सर्व),
८. सर्व विभागीय आयुक्त,
९. वनसंरक्षक (सर्व),
१०. जिल्हाधिकारी (सर्व),
११. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद (सर्व),
१२. प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व),
१३. उपवनसंरक्षक (सर्व),
१४. जिल्हा विकास अधिकारी, जिल्हा कृषि अधिकारी/ मृदसंधारण अधिकारी, जिल्हा,
१५. पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा आदिवासी कल्याण अधिकारी, जिल्हा उद्योग अधिकारी,
१६. जिल्हा सार्वजनिक आरोग्य अधिकारी,
१७. सर्व कार्यासन अधिकारी, महसूल व वन विभाग (वन कक्ष),
१८. निवड नस्ती (फ-२), महसूल व वन विभाग.

शासन निर्णय क्रमांकः- एफडीएम २०१०/प्र.क्र. ४०/फ-२, दि. २९.६.२०१० चे,

## जोडपत्र - अ

### संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रमातून महिला बचत गटांचा सहभाग वाढविण्याकरीता विशेष कृती कार्यक्रम २०१०-११

| अ.क्र. | वनवृत्त | संयुक्त वन व्यवस्थापन कार्यक्रमात सन २०१०-११ ते २०१४-१५ पर्यंत सहभागी करावयाच्या महिला बचत गटांचे उद्दीष्टे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकुण | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ |
| १ | अमरावती | १२०० | १२० | १२० | २४० | ३६० | ३६० |
| २ | औरंगाबाद | २४०० | २४० | २४० | ४८० | ७२० | ७२० |
| ३ | धुळे | २००० | २०० | २०० | ४०० | ६०० | ६०० |
| ४ | कोल्हापूर | ३६०० | ३६० | ३६० | ७२० | १०८० | १०८० |
| ५ | नागपूर | २६०० | २६० | २६० | ५२० | ७८० | ७८० |
| ६ | नाशिक | २४०० | २४० | २४० | ४८० | ७२० | ७२० |
| ७ | चंद्रपूर | १२०० | १२० | १२० | २४० | ३६० | ३६० |
| ८ | गडचिरोली | १४०० | १४० | १४० | २८० | ४२० | ४२० |
| ९ | पुणे | २४०० | २४० | २४० | ४८० | ७२० | ७२० |
| १० | ठाणे | ३८०० | ३८० | ३८० | ७६० | ११४० | ११४० |
| ११ | यवतमाळ | २००० | २०० | २०० | ४००० | ६०० | ६०० |
| एकुणः- | | २५००० | २५०० | २५०० | ५००० | ७५०० | ७५०० |

सही/-
(प्रफुल्ल ठाकूर)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग